ISSN 2349-638X

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

MONTHLY PUBLISH JOURNAL

VOL-I ISSUE-III AUG 2014

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- editor@aiirjournal.com
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

प्रभुत्व अध्ययन भविष्यकालीन अध्ययन तंत्र

प्रा.दीपक रामदास बाविस्कर

एम.ए.,एम.एड्.,एम.फिल.,सेट)

अभय शिक्षणशास्त्र महाविद्यालय,धुळे,

ता.जि.धुळे

प्रास्ताविक :—

शिक्षणामध्ये विद्यार्थ्याला,शिक्षणाच्या उद्दिष्टांना,अभ्यासक्रमाला,अध्यापनाला, अध्ययनाला महत्व आहे.उद्दिष्टानुरूप अभ्यासाचे अध्यापन अचूकपणे व प्रभावी झाले तर अध्ययन सहजसुलभ होते व जे उद्दिष्ट ठरविलेले असेल ते साध्य होते. हे अध्यापन व अध्ययन योग्य रीतीने झाले आहे किंवा नाही, त्यामुळे उद्दिष्ट साध्य झाली किंवा नाही, झाली असल्यास ती कितपत साध्य झाली हे आपणास मूल्यमापनाच्या सहाय्याने कळते.मूल्यमापनाच्या सहाय्याने अध्यापन व अध्यायनातील कच्चे दुवे लक्षात येतात. एखाद्या विद्यार्थ्याने एखाद्या विषयात ८० गुण मिळविले तर त्या विद्यार्थ्याची त्या विशिष्ट विषयात चांगली प्रगती आहे असे म्हणता येईल. पण त्याचे विषयावर प्रभुत्व (mastery)आहे किंवा नाही हे निश्चितपणे सांगणे कठीण आहे.त्या विद्यार्थ्याला मिळालेले गुण हे कदाचित त्याने त्या विशिष्ट विषयातील चांगली तयारी केलेल्या काही घटकांमुळे {विषय अंशामुळे}असेल,त्याला त्या विषयातील सर्व घटक चांगल्या रितीने अवगत झाले असतीलच असे खात्रीपुर्वक सांगता येत नाही.म्हणजेच त्या विद्यार्थ्याचे त्या विषायातील प्रभुत्व अध्ययन झाले असेल असे खात्रीपुर्वक सांगणे कठीण आहे. विद्यार्थ्याने आपल्या विषयात श्रेष्ठ प्राविण्य संपादन केले पाहिजे तरच त्याचे त्या विषयाचे खरे शिक्षण झाले असे म्हणता येईल. यासाठी प्रभुत्व अध्ययन म्हणजे काय?हे समजुन घेणे आवश्यक आहे.

विदयार्थ्यांमध्ये अध्ययन प्रभुत्व रुजविल्यास शिक्षकालाही आपले अध्यापन प्रभावी करण्यास मदत होईल.स्वत:ची परिणाम कारकता सिध्द करता येईल दृतसेच त्यांना कार्यसमाधानही त्यातून मिळणे सहज शक्य होईल. म्हणून प्रभुत्व अध्ययन संकल्पना महत्वाची आहे.

प्रभुत्व अध्ययन संकल्पना :—

शिक्षणामध्ये अगदी अलीकडेच ही कल्पना उदयास आली आहे.शिक्षणतज्ञांच्या लक्षात आली की,एखाद्या विद्यार्थ्याचे एखाद्या विषयावर सर्वतोपरी प्रभुत्व आहे की नाही हे तपासण्यास उत्कृष्ट कसोटी वा चाचणी उपलब्ध नाही. सर्वसाधारण पणे विषयातील प्राविण्य हे प्रमाण—संदर्भाकित कसोटीने {norm-referenced test}तपासले जाते. ह्या कसोटया वा चाचण्या शिक्षकाने केलेल्या असतात.त्यांनी प्राविण्य तपासता येते.विद्यार्थ्याचे विशिष्ट समुहातील स्थान हे गुणांकांनी व क्रमांकाने निश्चित केले जातात. विद्यार्थ्याच्या प्राविण्याचा संदर्भ त्या समुहाच्या प्रमाणावर असतो. परंतु विद्यार्थ्याच्या विशिष्ट विषयाच्या प्राविण्याची सखोलता व गुणवत्ता मोजली जातेच असे नाही. उदा:एखाद्या विद्यार्थ्याने गणित विषयात ९०गुण वा पहिला क्रमांक मिळविला म्हणजे गणित विषयातील त्याला सर्व ज्ञान झाले असे नाही.त्याच्या गुणांचा व क्रमांकाचा संदर्भ त्याच्या वर्गापुरता सीमित असतो.विद्यार्थ्याने विषयाचे सम्यक् श्रेष्ठ ज्ञान संपादन केले किंवा नाही हे

लक्षात येत नाही शिक्षण तज्ज्ञांनी संशोधन सुरू केले.विशिष्ट विषयातील श्रेष्ठ प्राविण्य हे त्या त्या विषयातील सर्वच्या सर्व अध्यापन उद्दिष्टे आत्मसात करण्यावर अवलंबून असते. ही सर्व अध्यापन उद्दिष्टे तपासण्यास प्रमाण—संदर्भांकित कसोटी अपुरी पडते.तसेच क्रमान्वित अध्ययनाचे मापन करण्यास प्रचीत प्राविण्य कसोटया पुरेशा नाहीत.हे प्रा.रॉबर्ट (पिटसबर्ग विद्यापीठ)यांच्या लक्षात आले व त्यांनी अध्यापन उद्दिष्टाधिष्टित निकष —संदर्भांकित कसोटी (Criterian Referenced test)चा पुरस्कार केला.विद्यार्थ्यांचे विशिष्ट विषयातील प्राविण्य निकष संदर्भांकित कसोटी तपासले असता विद्यार्थ्याने त्या विषयात प्रभुत्व संदान केले किंवा नाही हे लक्षात येते.

वरील सर्व विवेचनावरून प्रभुत्व म्हणजे विशिष्ट विषयाची सर्व उद्दिष्ट व विषय अध्यापनाची सर्व्रच्या सर्व उद्दिष्टे अवगत करून घेऊन ती आत्मसात करणे होय असे आपणास म्हणता येईल.“प्रभुत्व अध्ययन”साध्य करण्यासाठी काही गोष्टी (गृहितके) आपण प्रामुख्याने लक्षात घेतल्या पाहिजेत.म्हणून त्यांचा प्रथम विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

प्रभुत्व अध्ययनातील गृहीतके :—

१.विशिष्ट विषयाची ध्येये व अध्यापनाची उद्दिष्टे स्पष्टपणे मांडणे—

हे प्रभुत्व अध्ययनासाठी अत्यंत आवश्यक आहे व उपयुक्त आहे.विषयाची ध्येये, उद्दिष्टे व स्पष्टीकरणे व ती साण्य करण्यासाठी अध्यापनात प्रतिपाश्दन केलेली उद्दिष्टे यांचा परस्पर संबंध स्पष्ट मांडणे आवश्यक आहे.त्यात निश्चितता हवी.ह्या सर्वांची अध्यापकाला व अध्ययनार्थीला पुर्णपणे स्पष्ट कल्पना आली पाहिजे.

२.सर्व विद्यार्थी सर्व उद्दिष्टे साध्य करू शकतात—

याला अपवाद फक्त शारीरिक दृष्टया दुर्बल असलेले विद्यार्थी आहेत. प्रा.ब्लूम कॅरोल यांनी यावर व्यापक संशोधन केले आहे व त्यांच्या संशोधन निष्कर्षावर हे गृहितक आधारित आहे.

३.व्यक्तिगत भिन्नता लक्षात घेऊन व्यक्तिच्या संपुर्ण विकासास वाव मिळेल अशी अध्यापन रचना स्विकारणे शक्य आहे—

प्रभुत्व अध्ययनामध्ये विद्यार्थ्यांच्या क्षमता भिन्न भिन्न असतात.ही गोष्ट लक्षात घेतली आहे. व्यक्तिगत भिन्नता असली तरी सुध्दा विद्यार्थी श्रेष्ठ अध्ययन प्राप्त करू शकतो .त्यासाठी विशिष्टत—हेच्या अध्यापन रचनेची आवश्यक्ता असते.कॅरोलने यावर सखोल कार्य केले आणि त्याने काढलेल्या निष्कर्षाना बुनर व ग्लॅसर इ. सेशोधकांनीही दुजोरा दिला आहे.

प्रभुत्व अध्ययनावर परिणाम करणारे घटक:—

१.अभिवृती (aptitude) चा विद्यार्थ्यांच्या प्राविण्याशी अगदी घनिष्ट संबंध आहे असे समजले जाते.

विद्यार्थ्याचा विशिष्ट अध्यापन वस्तूबत (learning task) स्वाभाविक कल वा ओढा जर असेल तर विद्यार्थी त्यात प्राविण्य मिळवितो परंतू प्रत्येक विद्यार्थ्याने हे प्राविण्य मिळविले पाहिजे हे उद्दिष्ट प्रभुत्व अध्यापनात आहे.सर्व्रच विद्यार्थी लवकर वा उशिरा अध्ययन विषयवस्तुवर प्रभुत्व मिळवू शकतात असे आढळून आले आहे. अभिवृत्ति ही कमी जास्त असल्याने फारसा फरक पडत नाही.

कारण "अभिवृक्ति म्हणजे अध्ययनार्थीला विषयावर प्रभुत्व मिळविण्यासाठी लागणारा कालावधी होय".असे कॅरोल ने प्रतिपादन केले आहे.विद्यार्थ्याला पुरेसा वेळ दिला तर तो प्रभुत्व संपादन करू शकतो असे आढळून आले आहे.पुरेसा वेळ दिला व योगय ते सहारूय केले असता ९५% विद्यार्थी उच्चदर्जाचे प्रभुत्व प्राप्त करू शकतात. डॉ.ब्लूमच्या मते विशिष्ट अध्ययन विषय वस्तुवर प्रभुत्व मिळविण्यासाठी लागणारी ही अभिवृती पुर्णपणे स्थिर असत नाही. कारण अभिवृती मध्ये परिसरामुळे व घर व शाळेतील अध्ययन अनुभवामुळे थोडासा बदल व फरक पडू शकतो.पण तो नगण्य असतो.

२.दर्जेदार अध्यापन— प्रभुत्व संपादण्यास आवश्यक आहे हे उघड आहे. पण "दर्जेदार अध्यापन"म्हणजे काय?त्याचे खरे स्वरूप कोणते?त्याचे विवेचन करतांना असे मांडले जाते की,विद्यार्थ्यातील व्यक्तिभिन्नता लक्षात घेऊन अध्ययन वस्तुवर कमाल प्रभुत्व मिळविण्यासाठी (शिक्षक आणि अध्यापनात)केलेले प्रतिपादन,स्पष्टीकरण ,अध्ययन वस्तुतिल उपघटकांचा योग्य क्रम लावून केलेले क्रमबध्द विवेचन होय.)येथे विद्यार्थी विषयवस्तु कशी शिकतात हे लक्षात घेतले पाहिजे. काही विद्यार्थी स्वत:च शिकतात व शिकवतात तर काहींना क्रमबध्द आखीव अध्यापन योजनेची गरज असते. कांही विद्यार्थाना थोडेसे मार्गदर्शन पुरते तर काहींना मुर्त स्वरूपातकील उदाहरणे,स्पष्टीककरणे,दाखले इ.ची गरज वाटते.थोडक्यात विद्यार्थ्याच्या गरजा इ.लक्षात घेऊन अनुरूप अशी अध्यापन योजना करणे म्हणजेच दर्जेदार अध्यापन होय. यामुळे प्रभुत्व अध्ययनाला मदत होते. उत्कृष्ट अध्यापक हे सर्व लक्षात घेतो.

३.अध्यापनाची आकलनक्षमता—अध्यापन हे विद्यार्थ्याला समजले पाहिजे. त्याचा त्क्याला बोंध झाला पाहिजे."विषय वस्तुच्या स्वरूपाचे ज्ञान आणि त्याचे अध्ययन करण्यासाठी आवश्यक असलेल्सया कृति व पध्दती हे समजण्याची कुवत म्हणजे अध्यापन आकलन क्षमता होय. "सामान्यपणे शिक्षक व पाठयपुस्तक वा इतकर वस्तू हा एक संच अध्यापनात असतो. यात भाषिक तयारकेला जातो.

४.चिकाटी वा सातत्य— हे प्रभुत्व अध्ययनासाठी अत्यंत आवश्यक आहे. चिकाटी, दीर्घोद्योगीपणा अंगी असलेला विद्यार्थी सहज प्रभुत्व संपादन करू शकतो.अध्ययनार्थीने "अध्ययनासाठी स्वेच्छेने खर्च केलेला कालावधी असे सातत्याचे "वर्णन करता येईल.येथे अध्ययनासाठी दिलेला कालावधी व प्रत्यक्ष अध्ययनासाठी सक्रियतेने वापरलेला कालावधी यात फरक आहे हे लक्षात घेतले पाशहिजे.ह्या कालावधीचा म्हणजेच सातत्याचा वा चिकाटीचा विद्यार्थ्याच्या अध्ययनाबाबतच्या वृतीशी व अभिरूचीशी निकटचा संबध आहे. दीघोद्योगी गुणाची विद्यार्थ्यामध्ये वाढ व विकास करणे हे प्रभुत्व अध्ययन संपादन करण्यासाठी आवश्यक आहे. त्यासाठी अध्यापन पध्दतीत व अध्यापन साहित्यात नवनवीन अनुरूप बदल हेतुपुरस्सर व प्रयत्नपूर्वक करणे अगत्याचे आहे. प्रभुत्व अध्ययनासाठी योजावयाच्या अध्यापन रचनेत विद्यार्थ्याला लागणा—या कालावधीत बदल करणे तसेच व्यक्तिभिन्नता लक्षात घेऊन विद्यार्थ्याच्या व्यक्तिगत गरजेनुसार त्याला पुरेसा अवधी देणे आवश्यक आहे.तसेच अध्यापनपध्दतीबरोबर शालेय संघटनेचा रचनेचा विचार करावा लागतो.

प्रभुत्व—अध्ययनातील पाय—या/अध्यापनरचना :—

पाठयाविषयी ध्येय व उद्दिष्टे ठरविणे,त्याची स्पष्टीकरणे स्पष्ट,अचूक व निश्चित शब्दात मांडणे,त्यानुसार अध्यापन—आशय निश्चित करणे,या दोन्हीची स्पष्ट कल्पना व माहिती

अध्यापकाला व अध्ययनार्थीलाहवी.पाठयविषयाचे घटक,उपघटक,भाग यांचे उद्दिटानुसार अध्ययन झाल्यानंतर विद्यार्थ्याने त्यात किती प्रभुत्व संपदान केले आहे हे नैदानिक कसोटयाच्या साहाय्याने ठरविणे.ह्यामुळे विद्यार्थ्याच्या प्रभुत्वाची पातळी समजते.त्याचा साहाय्याने आपणास प्रत्याभरण मिळते व विद्यार्थ्याला प्रभुत्व मिळविण्यास मार्गदर्शन व साहाय्य करता येते.

प्रभुत्व संपादन करण्याची साणने वा पध्दती:—

प्रभुत्व अध्ययन प्राप्त करण्यासाठी विविध मार्ग वा साधनांचा उपयोग करता येईल तो पुढील प्रमाणे नैदानिक व उपचारात्मक कसोठयांच्या सहाय्याने निदान करून प्रभुत्व सपादनातील अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक ती उपचारात्मक उपाय योजना करता येतात.

दोन वा तीन विद्यार्थ्याच्या गटाने उपलब्ध निष्कर्षावर चर्चा करून चुका टाळण्यासाठी एकमेकास साहाय्य करणे,टयुटोरिअल पध्दतीचाही उपयोग प्रभुत्वसंचादन करण्यासाठी प्रभावीपणे करता येतो. अध्यापन साहित्यायतील किंवा पर्याय साहित्यातील काही संबंधित भागांचे पुन्हा पुन्हा वाचन करणे,आवश्यक ,निवडक व अनुरू प दृकश्राव्य साधनांचा वापर करणे.

प्रभुत्व अध्ययनाचे फायदे:—

ब्लूम व कॅरोल यांनी प्रभुत्व अध्ययनावर अनेक संशोधने केली. त्यातून ह्याचे अनेक फायदे दृष्टोत्पतीस आले आहेत.

पाठयविषयाबाबतच्या अभिवृतीत सुधारणा होते. विद्यार्थ्याला विषय आवडू लागातो व त्यातील अधिकाधिक माहिती मिळविण्यास तो प्रवृत होतो.त्याचा आत्मविश्वास वाढतो.मंदगतीच्या विद्यार्थ्यामध्ये आत्मविश्वास निर्माण होतो आणि त्यांच्यात आपणही यशस्वी होऊ शकतो ही भावना बळावते.सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे प्रभुत्व अध्ययनामुळे शिक्षणातील अपयशाची जबाबारी विद्यार्थ्यावर न राहता ती अध्यापकावर राहते आणि साहजिकच अध्यापकाचे अध्यापन अधिक जबाबदार व दर्जेदार होते. सर्व विद्यार्थी सर्व अध्ययन उद्दिष्टे साध्य करू शकतात यामुळे शिक्षणातील अपव्यय टाळणे शक्य होते.

संदर्भग्रंथ सूची :—

अरूण सांगोलकर,नविन जागतिक समाजातील शिक्षणाचे विचार प्रवाह;इनसाईट पब्लिकेशन्स,नाशिक,२०११

डॉ.अरविंद दुनाखे,भारतीय शिक्षण पध्दती व माध्यमिक शिक्षक;नुतन प्रकाश,पुणे १९९८

डॉ.म.बा.कुंडले;शैक्षणिक तत्वज्ञान आणि शैक्षणिक समाजशास्त्र;महाराष्ट्र विद्यापिठ ग्रंथ निर्मिती मंडळ,१९७५